सोमवार दि. ०७ सप्टेंबर २०२६ ● जालना ● वर्ष ८ वे ● अंक ०७ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एका छताखाली आरोग्य सेवा
डॉ. आनंद मान्ने Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# मराठा आरक्षणावर पक्षांनी अधिकृत भूमिका जाहीर करावी : आमदार संजय कुटे

## ‘सकल मराठा संवाद मेळाव्या’त आरक्षणाच्या तांत्रिक व कायदेशीर मुद्द्यांवर भाष्य









### कुटेंची चौफेर फटकेबाजी; दिलखुलास संवादातून जिंकली उपस्थितांची मने

‘सकल मराठा संवाद मेळाव्या’त आमदार संजय कुटे यांनी चौफेर फटकेबाजी करत उपस्थित समाजबांधवांशी दिलखुलास संवाद साधला. सामाजिक कार्य, पत्रकारांची भूमिका, मराठा आरक्षणाचा प्रश्न आणि त्यावरील संभाव्य तोडगा यावर त्यांनी रोखठोक भूमिका मांडली. उशिराने मेळाव्याला आगमन झाले असतानाही आमदार कुटे यांनी उपस्थितांशी मनमोकळेपणाने संवाद साधत विविध प्रश्नांवर स्पष्ट भूमिका मांडली.
आरक्षणाचा प्रश्न भावनिक असला तरी त्याचे निराकरण करताना सामाजिक समन्वयासोबतच कायदेशीर व तांत्रिक बाबींचाही विचार होणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सामाजिक प्रश्नांवर काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची भूमिका तसेच समाजापर्यंत वस्तुनिष्ठ माहिती पोहोचविण्यात पत्रकारांची जबाबदारी यावरही त्यांनी भाष्य केले. त्यांच्या थेट, स्पष्ट आणि मिश्कील शैलीतील संवादाला उपस्थितांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.
उशिराने आलेले कुटे संवाद संपेपर्यंत उपस्थितांच्या चर्चेचा केंद्रबिंदू ठरले.

**जालना । प्रतिनिधी**

मराठा आरक्षणाचा प्रश्न दिवसेंदिवस अधिक संवेदनशील आणि गुंतागुंतीचा होत असताना या विषयावर आमदारांनी आपल्या मतदारसंघातील राजकीय समीकरणांचा विचार करून वैयक्तिक भूमिका मांडण्याऐवजी राज्यातील प्रमुख राजकीय पक्षांनीच आपली अधिकृत, स्पष्ट आणि ठाम भूमिका महाराष्ट्राच्या जनतेसमोर जाहीर करावी, असे खुले आवाहन भारतीय जनता पक्षाचे माजी प्रदेश सरचिटणीस तथा आमदार संजय कुटे यांनी केले.

जालना येथे छत्रपती व्ही. के. फाउंडेशन आणि छावा महाराष्ट्र सेना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ‘सकल मराठा संवाद मेळाव्या’त ते मुख्य मार्गदर्शक म्हणून बोलत होते. या मेळाव्यास मराठा समाजातील नागरिकांची मोठी उपस्थिती होती. मराठा आरक्षणाच्या सद्यस्थितीवर चर्चा करताना आमदार कुटे यांनी सरकार तसेच आंदोलनकर्त्यांच्या भूमिकांवरही प्रश्न उपस्थित केले. त्यामुळे या मेळाव्याला सामाजिक तसेच राजकीयदृष्ट्या विशेष महत्त्व प्राप्त झाले.

**मतदारसंघानुसार भूमिका बदलणे योग्य नाही**

आमदार संजय कुटे म्हणाले की, मराठा आरक्षणाचा प्रश्न अत्यंत क्लिष्ट झाला आहे. या प्रश्नावर स्पष्ट आणि ठोस भूमिका घेण्यास अनेक जण टाळाटाळ करीत असल्याचे चित्र आहे. काही आमदार पक्षाची अधिकृत भूमिका मांडण्याऐवजी आपल्या मतदारसंघातील जातीय समीकरणांचा विचार करून भूमिका घेत असल्याचा आरोप त्यांनी केला.

ज्या मतदारसंघांमध्ये मराठा समाजाच्या मतदारांचे प्राबल्य आहे, तेथे मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण देण्याची मागणी केली जाते. मात्र, ज्या मतदारसंघांमध्ये ओबीसी मतदारांची संख्या अधिक आहे, तेथे त्याच मागणीला विरोध केला जातो. राजकीय सोयीनुसार भूमिका बदलण्याच्या या प्रकारामुळे समाजात संभ्रम निर्माण होत असल्याचे कुटे यांनी सांगितले. ‘‘आरक्षणासारख्या संवेदनशील आणि दीर्घकालीन परिणाम करणाऱ्या प्रश्नावर मतदारसंघनिहाय भूमिका नको, तर पक्षाची अधिकृत भूमिका काय आहे हे जनतेला समजले पाहिजे,’’ असा मुद्दा त्यांनी मांडला.

**५८ लाख कुणबी नोंदींच्या चर्चेवर प्रश्न**

मराठा आरक्षणाच्या तांत्रिक मुद्द्यांवर भाष्य करताना आमदार कुटे यांनी राज्यात सापडल्याचे सांगितल्या जाणाऱ्या ५८ लाख कुणबी नोंदींच्या चर्चेवरही प्रश्न उपस्थित केला. या नोंदी नवीन नसून विदर्भ, खानदेश आणि पश्चिम महाराष्ट्रातील विविध भागांमध्ये त्या पूर्वापार अस्तित्वात असल्याचे त्यांनी सांगितले.

मराठवाड्याच्या संदर्भात सुमारे २६ हजार कुणबी नोंदी सापडल्याचे त्यांनी नमूद केले. या नोंदींचे स्वरूप, त्यांची वैधता आणि त्यावर आधारित पुढील कायदेशीर प्रक्रिया याबाबत जनतेसमोर स्पष्ट माहिती असणे आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. आरक्षणाचा प्रश्न केवळ राजकीय घोषणांवर किंवा भावनिक आवाहनांवर



सोडविता येणार नाही. त्यासाठी उपलब्ध नोंदी, पुरावे, कायदेशीर तरतुदी आणि प्रशासकीय प्रक्रियेचा विचार करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

**आंदोलनामुळे समाजाला फायदा झाल्याचे कुटेंचे मत**

मराठा आरक्षणासाठी सुरू असलेल्या आंदोलनाचा थेट उल्लेख करताना आमदार कुटे यांनी आंदोलनामुळे समाजाला फायदा झाल्याचे नमूद केले. आंदोलनामुळे मराठा आरक्षणाचा प्रश्न राज्याच्या राजकीय अजेंड्यावर अधिक ठळकपणे आला आणि त्यावर व्यापक चर्चा घडून आली, असे त्यांनी सांगितले.

आंदोलनकर्त्यांकडून ‘हैदराबाद गॅझेट’च्या आधारे आरक्षण देण्याची प्रमुख मागणी केली जात आहे. मात्र, या आधारे अद्याप प्रशासनाकडून एकही कुणबी प्रमाणपत्र जारी झालेले नसल्याचा दावा कुटे यांनी केला. त्यामुळे या मागणीची प्रत्यक्ष प्रशासकीय आणि कायदेशीर प्रक्रिया काय आहे, याबाबत सरकारने स्पष्ट माहिती जनतेसमोर ठेवावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

**सरकार आणि आंदोलनकर्त्यांनी तांत्रिक बाजू स्पष्ट करावी**

मराठा आरक्षणाचा प्रश्न सोडविताना सरकार आणि आंदोलनकर्ते या दोन्ही बाजूंनी आरक्षणाच्या तांत्रिक, प्रशासकीय आणि कायदेशीर बाबी स्पष्टपणे जनतेसमोर मांडणे आवश्यक आहे, असे आमदार कुटे यांनी सांगितले.

आरक्षणाचा प्रश्न भावनिक असला तरी त्यावर अंतिम तोडगा काढण्यासाठी कायदेशीर चौकटीचा विचार अपरिहार्य आहे. त्यामुळे सरकारने कोणत्या आधारावर निर्णय घेण्याचा विचार केला आहे, आंदोलनकर्त्यांच्या मागण्यांची पूर्तता करण्यासाठी कोणती प्रशासकीय पावले उचलली जात आहेत आणि त्यातील कायदेशीर अडचणी कोणत्या आहेत, याची माहिती पारदर्शकपणे देणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.

**संवाद मेळाव्याला मान्यवरांची उपस्थिती**

या संवाद मेळाव्यास आमदार नारायण कुचे, जालना मनपाचे उपमहापौर राजेश राऊत, नगरसेवक भास्कर दानवे, मनोज वाघ, माजी उपनगराध्यक्ष सुनील आर्दड, ज्येष्ठ पत्रकार अंकुशराव देशमुख, मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख, सभापती संध्या देठे, विभावरी ताकट, संभाजी ब्रिगेडचे संस्थापक कोषाध्यक्ष संतोष गाजरे, जिल्हाध्यक्ष भागवत काळे, उपाध्यक्ष नामदेव काळे, तालुकाध्यक्ष उद्धवराव गुळमकर, राजाभाऊ गुलगे, गणपत जाधव, शिवसेना तालुकाप्रमुख ज्ञानेश्वर सोनवणे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर आणि समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख, युवा नेते सुनील बापू आर्दड, ज्योतीराम माने यांच्यासह प्रमुख मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आयोजक विष्णू कदम यांनी केले.

**पत्रकारांचा विशेष सत्कार**

मेळाव्याच्या निमित्ताने विविध क्षेत्रांतील मान्यवरांसह पत्रकारांचा विशेष सत्कार करण्यात आला. मराठी पत्रकार परिषद जालना अध्यक्ष अंकुश आप्पा देशमुख, व्हॉइस ऑफ मीडियाचे अध्यक्ष राजेश भालेराव, प्रेस कौन्सिल महाराष्ट्र जालना जिल्हाध्यक्ष दीपक शेळके, संपादक भरत मानकर, संतोष भुतेकर, अर्पण गोयल, अंकुश गायकवाड, उपसंपादक संजय शेलकर, रवि शिंदे, संपादक विकास बागडी, भगवान साबळे, संदीप भाकरे, बंडू सुरडकर, सुशील कुमार वीठोरे, गोविंद प्रसाद मुंदडा, अमीर खान, संजय उनगे, अविश्वास कवळे, शेख नुर, सुनिल नरवडे, हुसेन कादरी आदी पत्रकारांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

**राजकीय पक्षांच्या भूमिकेकडे लक्ष**

मराठा आरक्षणाचा प्रश्न सध्या महाराष्ट्राच्या राजकारणातील अत्यंत संवेदनशील मुद्दा बनला आहे. या पार्श्वभूमीवर आमदार संजय कुटे यांनी केलेले आवाहन राजकीयदृष्ट्याही (पान २ वर)

---

# घोषणांचे गाजर दाखवणाऱ्या सरकारला आता जनता उत्तर देईल

## जालन्यात शिवसेनेचे ‘तुम से ना हो पायेगा’ आंदोलन; अंबादास दानवेंचा सरकारवर हल्लाबोल





**जालना - प्रतिनिधी**

मराठवाड्याच्या विकासासाठी कोट्यवधी रुपयांच्या पॅकेजच्या घोषणा करूनही प्रत्यक्षात विकासकामांची प्रगती अत्यल्प आहे. जाहीर केलेल्या योजनांपैकी अनेक योजना अद्याप अपूर्ण असून सरकार केवळ घोषणांचे गाजर दाखवत आहे, असा घणाघाती आरोप विधान परिषदेचे माजी विरोधी पक्षनेते आमदार अंबादास दानवे यांनी रविवारी केला. जालना शहरातील महात्मा गांधी चमन येथे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने आयोजित ‘तुम से ना हो पायेगा’ आंदोलनात ते बोलत होते. यावेळी आमदार कैलास पाटील, जिल्हाप्रमुख मनीष श्रीवास्तव, जिल्हाप्रमुख महेश नळगे, जिल्हा संघटक भानुदास घुगे, उपजिल्हाप्रमुख रमेश गव्हाड, भगवान कदम,हनुमान धांडे,महिला जिल्हाप्रमुख रूपम घुगे, कुमार रुपवते, अशोक आघाव, महेश पुरोहित,दिलीप घुगे, तालुकाप्रमुख कुंडलिक मुठ्ठे,नगरसेवक गणेश नळगे यांच्यासह मोठ्या संख्येने शिवसैनिक सहभागी झाले. आंदोलकांनी हातात गाजर घेऊन सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. दानवे म्हणाले, २०१६ मध्ये देवेंद्र फडणवीस आणि १६ सप्टेंबर २०२३ रोजी एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना छत्रपती संभाजीनगर येथे मंत्रिमंडळाच्या बैठका घेऊन मराठवाड्यासाठी मोठ्या पॅकेजच्या घोषणा करण्यात आल्या. मात्र, या घोषणांचा आढावा घेतला तर प्रत्यक्षात केवळ दीड ते दोन टक्केच काम

झाल्याचे दिसते, असा दावा त्यांनी केला. सिंचन, पाणी आणि मूलभूत सुविधांचे प्रश्न आजही कायम असल्याचे ते म्हणाले. जालना शहराला आजही १५ दिवसांनी पाणीपुरवठा होतो, मग विकास कुठे झाला? असा सवाल करत दानवे यांनी जालना पाणीपुरवठा योजना, अंबड येथील ३५ एमएलडी जलशुद्धीकरण केंद्र, जाफराबाद पाणीपुरवठा योजना, ७२८ कोटींचा निम्न दुधना प्रकल्प, आयटीआय इन्क्युबेशन सेंटर, मनोरुग्णालय, सीड पार्क यांसह विविध प्रकल्पांच्या रखडलेल्या कामांचा मुद्दा उपस्थित केला. जालना ड्रायपोर्टचे अनेकदा उद्घाटन आणि गाजावाजा करण्यात आला; मात्र प्रत्यक्षात फलक, कमान, रेल्वे रूळ आणि गोदाम यापलीकडे काहीही दिसत नाही, असा आरोपही त्यांनी केला. जालना-खामगाव रेल्वेमार्गाच्या घोषणेपासून ते जालना-नांदेड समृद्धी महामार्गाच्या भूसंपादनापर्यंत विविध मुद्द्यांवरून दानवे यांनी सरकारला लक्ष्य केले. ‘लाडक्या बहिणींना दीड हजार देतात आणि चार हजार काढून घेतात’ असा आरोप आमदार कैलास पाटील यांनी केला. खतांचे वाढते दर, वाढलेला उत्पादन (पान २ वर)

---

बैलपोळ्याला ऊस उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा!

# समृद्धी व घृष्णेश्वरकडून प्रतिटन १०० रुपयांचा वाढीव हप्ता

**जालना - प्रतिनिधी**

शेतकरी बांधवांचा सर्वांत महत्त्वाचा सण असलेल्या बैलपोळ्यानिमित्त ‘समृद्धी व घृष्णेश्वर साखर कारखान्या’च्या वतीने शेतकरी बांधवांच्या खात्यात प्रतिमेट्रिक टन १०० रुपयांचा वाढीव हप्ता वर्ग करण्यात आला आहे. तसेच आगामी दिवाळी सणाला गाळप हंगाम २०२५-२६ च्या अंतिम हप्त्याची घोषणा कारखान्याच्या संचालक मंडळाच्या निर्णयानंतर करण्यात येणार असल्याची माहिती कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे पाटील यांनी दिली आहे. गाळप हंगाम २०२५-२६ मध्ये समृद्धी व घृष्णेश्वर साखर कारखान्यात गाळप झालेल्या शेतकऱ्यांच्या उसासाठी पहिला हप्ता प्रतिमेट्रिक टन २,८०० रुपये याप्रमाणे देण्यात आला. त्यानंतर बैलपोळ्यानिमित्त शेतकऱ्यांना प्रतिमेट्रिक टन १०० रुपयांचा वाढीव हप्ता देण्याचा निर्णय कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत संचालक मंडळाने घेतला. सदर रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात आली आहे. सध्या आर्थिक अडचणींचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांना संकटाच्या काळात वाढीव हप्ता मिळाल्याने शेतकरी वर्गामध्ये समाधानाचे वातावरण आहे. वाढीव हप्ता थेट खात्यात जमा केल्याबद्दल शेतकऱ्यांनी कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे पाटील, व्हाईस चेअरमन महेंद्र मेठी तसेच सर्व संचालक मंडळाचे आभार मानले.

**दिवाळी जाहीर करणार अंतिम भाव - सतीश घाटगे**

गाळप हंगाम २०२५-२६ मधील उसाचा हा अंतिम भाव नसून, शेतकऱ्यांच्या उसाचा अंतिम भाव दिवाळी सणाला जाहीर करण्यात येणार असल्याचे सतीश घाटगे पाटील यांनी स्पष्ट केले आहे.

**बैलपोळा सणासाठी शेतकऱ्यांना साखरेचे वाटप**

**बैलपोळा सणानिमित्त कारखान्याच्या सभासद**

. शेतकऱ्यांना अल्पदरात साखरेचे वाटप करण्यात येणार आहे.

मंगळवार, दि. ८ सप्टेंबर २०२६ पासून साखर वाटप सुरू होणार असून, सर्व सभासद शेतकऱ्यांनी सवलतीच्या दरातील साखरेचा लाभ घ्यावा, असे आवाहन शेतकी विभागाने केले आहे.

# संपादकीय...

## नियमावली कागदावरच राहणार की मनपा प्रत्यक्षात उतरवणार?

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर जालना शहर महानगरपालिकेने सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांसाठी १७ कलमी नियमावली जाहीर केली आहे. परवानगीशिवाय मंडप व कमानी उभारू नयेत, रस्ते-पदपथ अडवू नयेत, अनधिकृत वीजजोडणी घेऊ नये, ध्वनिप्रदूषण करू नये, स्वच्छता राखावी, अग्निसुरक्षेची साधने उपलब्ध ठेवावीत, वाहतुकीला अडथळा निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी, अशा अनेक सूचना या नियमावलीत करण्यात आल्या आहेत. कागदावर पाहता ही नियमावली निश्चितच स्वागतार्ह आहे. गणेशोत्सव हा श्रद्धेचा आणि सामाजिक एकोप्याचा उत्सव आहे. त्यामुळे उत्सव साजरा करताना नागरिकांची सुरक्षितता, वाहतुकीची शिस्त, स्वच्छता आणि पर्यावरणाचे भान ठेवणे आवश्यकच आहे. मात्र, प्रश्न नियमावलीचा नाही; प्रश्न तिच्या अंमलबजावणीचा आहे. मनपाने नियम सांगितले आहेत; आता शहरातील नागरिकांचा साधा प्रश्न आहे. जे बोलले ते मनपा प्रत्यक्षात करणार का?
दरवर्षी सण-उत्सवांच्या काळात विविध मंडळांकडून रस्ते, पदपथ आणि सार्वजनिक जागांवर मंडप उभारले जातात. काही ठिकाणी वाहतुकीची कोंडी होते, पादचाऱ्यांना मार्ग मिळत नाही, तर काही ठिकाणी रुग्णवाहिका किंवा अग्निशमन वाहनांना अडथळा निर्माण होण्याची शक्यता असते. या पार्श्वभूमीवर मनपाने स्पष्ट नियम केले आहेत. पण या नियमांची अंमलबजावणी करताना लहान-मोठा, राजकीय प्रभाव असलेला किंवा सामान्य मंडळ असा भेद केला जाणार नाही, याची खात्री प्रशासन देणार का? नियम तोडणाऱ्या मंडळावर कारवाई करण्याची घोषणा करणे सोपे आहे; प्रत्यक्ष कारवाई करताना राजकीय, सामाजिक किंवा स्थानिक दबावाला न जुमानता कायद्याची समान अंमलबजावणी करणे ही खरी कसोटी असेल. मनपाने परवानगीशिवाय मंडप अथवा कमान उभारल्यास कारवाईचा इशारा दिला आहे. मग शहरातील प्रत्येक मंडपाची तपासणी कोण करणार? किती पथके नियुक्त केली आहेत? परवानगी घेतलेल्या मंडळांची अधिकृत यादी सार्वजनिक केली जाणार का? परवानगीतील अटींचे उल्लंघन करणाऱ्यांवर तत्काळ कारवाई होणार का? केवळ मंडप उभारल्यानंतर नोटीस देणे किंवा दंड करणे पुरेसे नाही. प्रतिबंधात्मक तपासणी व्यवस्था निर्माण केली तरच नियमांचा धाक निर्माण होईल. ध्वनिक्षेपकासाठी परवानगी, वेळेची मर्यादा आणि ध्वनिमर्यादा यांचा उल्लेख नियमावलीत आहे. परंतु गणेशोत्सवातील सर्वात मोठ्या तक्रारींपैकी एक तक्रार ध्वनिप्रदूषणाची असते. रात्री उशिरापर्यंत सुरू असलेले ध्वनिवर्धक, डीजे आणि मोठ्या आवाजातील कार्यक्रम यावर मनपा, पोलीस आणि संबंधित यंत्रणा प्रत्यक्षात किती नियंत्रण ठेवणार? नियम मोडणाऱ्यांवर कारवाई झाल्यानंतर ती माहिती जनतेसमोर आणली जाणार का? नियम लिहिण्यापेक्षा नियम मोडल्यावर कारवाई झाल्याचे उदाहरण निर्माण करणे अधिक प्रभावी ठरेल. मंडळांनी परिसर स्वच्छ ठेवावा, ओला-सुका कचरा वेगळा करावा, निर्माल्य स्वतंत्रपणे जमा करावे, असे निर्देश योग्य आहेत. मात्र, गणेशोत्सव काळात मोठ्या प्रमाणावर निर्माण होणारा कचरा आणि निर्माल्य वेळेत उचलण्याची व्यवस्था मनपानेही करणे गरजेचे आहे. मंडळांनी कचरा योग्य ठिकाणी दिल्यानंतर तो वेळेत उचलला गेला नाही तर तो पुन्हा रस्त्यावरच पडणार. त्यामुळे 'नागरिकांनी कर्तव्य पार पाडावे' या अपेक्षेसोबत 'मनपानेही आपली यंत्रणा सज्ज ठेवावी' ही अपेक्षा रास्त आहे. गणेशोत्सवाच्या काळात सर्वाधिक गर्दी विसर्जनस्थळी होते. त्यामुळे विसर्जन कुंड, तलाव परिसर, प्रकाशयोजना, सुरक्षा व्यवस्था, बॅरिकेडिंग, स्वच्छता, आपत्कालीन सेवा आणि गर्दी नियंत्रण याकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. फक्त मंडळांना नियम सांगून मनपाची जबाबदारी संपत नाही. विसर्जनस्थळी मूलभूत सुविधा उपलब्ध आहेत का, याची पाहणी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष करणे गरजेचे आहे. मंडपात अग्निशामक यंत्रे, वाळूच्या बादल्या आणि आपत्कालीन निर्गमन मार्ग ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. हे अत्यंत महत्त्वाचे आहे. मात्र, आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास ही साधने प्रत्यक्ष वापरण्यायोग्य आहेत का, त्यांची तपासणी झाली आहे का, याची पडताळणी कोण करणार? एक छोटी दुर्घटनाही मोठे संकट निर्माण करू शकते. त्यामुळे अग्निसुरक्षेच्या नियमांमध्ये 'कागदोपत्री अनुपालन' नव्हे तर प्रत्यक्ष तपासणी आवश्यक आहे. अनधिकृत आकडे किंवा हुक टाकून वीज घेण्यास मनाई करण्यात आली आहे. ही बाब मंडपांच्या सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहे. मात्र, यासाठी महानगरपालिका आणि वीज वितरण कंपनीने संयुक्त तपासणी मोहीम राबविण्याची गरज आहे. अनधिकृत जोडणीमुळे आग लागण्यासारखी दुर्घटना घडल्यावर कारवाई करण्यापेक्षा दुर्घटना होण्यापूर्वीच तपासणी करून धोका दूर करणे अधिक महत्त्वाचे आहे. या संपूर्ण नियमावलीची विश्वासार्हता वाढवायची असेल तर मनपाने उत्सवानंतर केवळ 'गणेशोत्सव शांततेत पार पडला' एवढे सांगून थांबू नये. किती मंडळांनी परवानगी घेतली? किती मंडपांची तपासणी झाली? किती ठिकाणी नियमभंग आढळला? किती जणांवर दंडात्मक कारवाई झाली? किती अनधिकृत मंडप हटविण्यात आले? ध्वनिप्रदूषणाच्या किती तक्रारी आल्या? किती अनधिकृत वीजजोडण्या आढळल्या? किती ठिकाणी वाहतुकीला अडथळा निर्माण झाला? या प्रश्नांची आकडेवारी मनपाने जाहीर केली तरच १७ कलमी नियमावली केवळ कागदावरील आदेश नव्हता, तर प्रत्यक्षात राबविला गेला, असे म्हणता येईल. महानगरपालिका आयुक्त अंजली शर्मा यांच्या स्वाक्षरीने ही नियमावली जाहीर झाली आहे. त्यामुळे आता या नियमावलीची अंमलबजावणी ही प्रशासनाच्या नेतृत्वाचीही परीक्षा ठरणार आहे. शहरातील नागरिकांना नियम हवेत, पण त्याहून अधिक समान नियम आणि निष्पक्ष कारवाई हवी आहे. नियम सामान्य मंडळांसाठी कठोर आणि प्रभावशाली मंडळांसाठी सैल असा दुहेरी मापदंड निर्माण झाला तर प्रशासनाच्या आदेशावरील विश्वासच कमी होईल. याबाबत केवळ मनपावर टीका करून चालणार नाही. गणेशोत्सव मंडळांनीही प्रशासनाच्या नियमांचे पालन करणे ही आपली सामाजिक जबाबदारी समजली पाहिजे. मंडप उभारताना रस्ता अडविणे, मोठ्या आवाजात ध्वनिक्षेपक वाजविणे, अनधिकृत वीजजोडणी घेणे किंवा परिसर अस्वच्छ ठेवणे हा 'उत्सवाचा अधिकार' नाही. उत्सव मोठा असण्यापेक्षा तो शिस्तबद्ध असणे महत्त्वाचे आहे. जालना मनपाने १७ कलमी नियमावली जाहीर करून चांगली सुरुवात केली आहे.

# कत्तलीसाठी अवैधरित्या वाहतूक करणाऱ्या २८ गोवंशांची सुटका

## कंटेनरसह सुमारे ₹३५.९० लाखांचा मुद्देमाल जप्त, आरोपी अटकेत

**परतूर - प्रतिनिधी**

परतूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे परतूर पोलिसांनी तात्काळ कारवाई करून कत्तलीच्या उद्देशाने अवैधरित्या वाहतूक करण्यात येत असलेल्या २८ गोवंशांची सुटका केली. या कारवाईत गोवंशांची वाहतूक करणारा अशोक लिल्यांड, कंपनीचा कंटेनर (क्र. ०४ ८८०२) जप्त करण्यात आला.

सदर प्रकरणी गु.र.नं. ०४२९/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ३(५), महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम, १९७६ तसेच महाराष्ट्र प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम, १९६० मधील संबंधित तरतुदींनुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीस अटक करण्यात आली आहे. जप्त करण्यात आलेल्या २८ गोवंश व कंटेनर असा एकूण सुमारे ₹३५.९० लाखांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे.



ही उल्लेखनीय कारवाई मा. पोलीस अधीक्षक तेघबीर सिंग संधू, मा. अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी व मा. उपविभागीय पोलीस अधिकारी आर. टी. रेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सुदाम भागवत, पोलीस उपनिरीक्षक अमोल रावते, पोलीस कॉन्स्टेबल खंदारे, पो.कॉ. जाधव (ब.क्र. १४१९), गीते, गोविंद पवार, ज्ञानेश्वर वाघ, परमेश्वर माने व नितीन बोन्डारे यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

सदर प्रकरणातील आरोपीस अटक करण्यात आली असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक अमोल रावते हे करीत आहेत.

# आद्य क्रांतिकारक नरवीर उमाजी नाईक

१८५७ साली झालेला उठाव हा भारतीय इतिहासातील इंग्रजांविरोधात झालेला पहिला उठाव आहे असे मानले जाते मात्र त्या अगोदरही इंग्रजांना भारतातून हाकलून देण्यासाठी अनेक छोटेमोठे उठाव झाले मात्र त्यातील काही उठावांची नोंद इतिहासात घेण्यात आली तर काही काही उठावांची नोंदच झाली नाही. अशाच एका उठावाचे जनक ज्यांनी इंग्रजांना सलग १४ वर्ष पळता भुई थोडी केली त्या आद्य क्रांतिकारक राजे उमाजी नाईक यांची आज जयंती. मात्र आज त्यांची जयंती असूनही त्यांची जयंती साजरी करावी असे कोणालाही वाटत नाही कारण ते ज्या समाजात जन्मले तो रामोशी बेडर समाज आजही उपेक्षितच आहे त्यामुळे इतका मोठा क्रांतिकारक भारताच्या इतिहासात होऊन गेला हे आजही अनेकांना माहीत नाही. आद्य क्रांतिकारक नरवीर उमाजी नाईक यांचा जन्म ७ सप्टेंबर १७९१ रोजी पुणे जिल्ह्यातील भिवडी येथे झाला. त्यांच्या आईचे नाव लक्ष्मीबाई व वडिलांचे नाव दादोजी खोमणे होते. त्यांचे कुटुंबीय पुरंदर किल्ल्याच्या संरक्षणाची जबाबदारी पार पाडत असे म्हणून त्यांना नाईक ही पदवी मिळाली पुढे ते नाईक याच नावानेच ओळखले जाऊ लागले. लहानपणापासून काटक, चंचल आणि शूर असणारे निधड्या छातीचे उमाजी नाईक यांना गुलामगिरीची चीड होते. इंग्रजांनी पुण्यात दुसऱ्या बाजीरावास स्थानापन्न केले तेंव्हा त्यांनी पुरंदर किल्ल्याच्या संरक्षणाची जबाबदारी रामोशी बेडर समाजाकडून काढून घेतली आणि स्वतःच्या मर्जीतील लोकांना ती जबाबदारी दिली त्यामुळे साहजिकच रामोशी समाज खवळला त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली. छत्रपती शिवाजी महाराजांनी दिलेली जबाबदारी अशी अचानक काढून घेतल्याने उमाजी नाईक कमालीचे संतप्त झाले शिवरायांपासूनच स्फूर्ती घेऊन त्यांनी आपल्या काही साथीदारांसह इंग्रजांना भारतातून हाकलून देण्याची शपथ घेतली. उमाजी नाईक समाजातील गोरगरिबांना आर्थिक मदत करत त्यासाठी ते इंग्रज, सावकार आणि मोठ्या वतनदारांना लुटत. जर कोणी माता भगिनींवर अन्याय करत असत तर ते भावाप्रमाणे धावून जात असत. या दरम्यान त्यांना एकदा अटक झाली त्यांना एका वर्षाची शिक्षा झाली. या एका वर्षात ते तुरुंगातच लिहायला शिकले. एका वर्षाची शिक्षा भोगून आल्यावर त्यांच्या कारवाया आणखी वाढल्या. छत्रपती शिवाजी महाराजांना आदर्श मानून त्यांनी इंग्रजांविरुद्ध लपून छपून लढाया केल्या. उमाजी नाईक यांच्या या गनिमीकाव्याने इंग्रज मेटाकुटीला आले. इंग्रज अधिकारी उमाजींना पकडण्यासाठी जंग जंग पछाडत होते मात्र उमाजी त्यांच्या हातावर तुरी देत होते. एकदा इंग्रज आणि उमाजींचे सैन्य समोरासमोर आले तेंव्हा उमाजींच्या सैन्याने इंग्रजांच्या सैन्याचा पराभव केला. या लढाईत उमाजींनी पाच इंग्रजांची मुंडकी उडवली त्यामुळे इंग्रज अधिकच भयभीत झाले. त्यांच्या मनात उमाजींची भीती बसली. १८२४ ला उमाजींनी भाबुर्डी येथील इंग्रजांचा खजिना लुटून देवळाच्या देखभालीसाठी लोकांना वाटला. २१ डिसेंबर १८३० ला उमाजींनी आपला पाठलाग करणाऱ्या इंग्रज अधिकारी बॉईड आणि त्याच्या सैन्याला मांढरदेवी गडावरून बंदुका, गोफणी चालवून पळवून लावले. त्यांच्या या बंडाला जनतेतूनही मोठा प्रतिसाद मिळत होता. उमाजी नाईक यांनी इंग्रजांविरुद्ध एक जाहीरनामा प्रसिद्ध केला होता त्यात त्यांनी नमूद केले होते की लोकांनी इंग्रजांच्या नोकऱ्या सोडाव्यात. इंग्रजांविरुद्ध सर्वांनी एकत्र यावे. इंग्रज सरकार विरोधात अराजकता माजवावी. इंग्रजांचा खजिना लुटून तो गोरगरिबांना वाटावा. इंग्रजांशी असहकार पुकारवा. त्यांना शेतसारा, पट्टी देऊ नये. त्यांच्या या जाहिरनाम्याचे पालन सर्वसामान्य जनता करू लागल्याने इंग्रज आणखी बिथरले. त्यांनी उमाजींना पकडण्यासाठी आता फोडा आणि झोडा नीती अवलंबली. उमाजींची माहिती देणाऱ्यास १० हजार रुपये आणि चारशे बिघा जमीन मिळेल असे बक्षिस ठेवले. इंग्रजांची ही नीती कामी आली. एका महिलेचे अपहरण केले म्हणून काळोजी नाईक याचे हात उमाजींनी कलम केले होते तो इंग्रजांना जाऊन मिळाला. उमाजींच्या जवळचा नाना चव्हाण हा देखील इंग्रजांना जाऊन मिळाला. या दोघांनी फितुरी करून उमाजींची माहिती इंग्रजांना दिली. १५ डिसेंबर १८३१ रोजी भोर तालुक्यातील उत्रोली गावात उमाजींना पकडण्यात आले. उमाजींवर देशद्रोहाचा खटला चालवण्यात आला. ३ फेब्रुवारी १८३२ ला उमाजींना फाशी देण्यात आली. देशासाठी फासावर जाणारा उमाजी हा पहिला क्रांतिकारक ठरला.

फासावर चढण्यापूर्वी उमाजींचे शेवटचे शब्द होते शिवाजी महाराज की जय! वयाच्या अवघ्या ४१ व्या वर्षी देशासाठी हसत हसत फासावर चढणारा हा क्रांतिकारक भारताच्या इतिहासातील पहिला क्रांतिकारक ठरला म्हणून त्यांना आद्यक्रांतिकारक असे म्हणतात. त्यांच्याकडून प्रेरणा घेऊन पुढे अनेक क्रांतिकारक देशात निर्माण झाले मात्र दुर्दैवाने या महान क्रांतिकारकाने केलेली क्रांती आजही खूप कमी लोकांना माहीत आहे म्हणूनच आज त्यांच्या जयंतीदिनी सर्वांनी त्यांच्या कार्याची ओळख नवीन पिढीला करुन द्यावी. आद्यक्रांतिकारक नरवीर उमाजी नाईक यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# डॉल्फिन इंग्लिश स्कूल येथे गोकुळाष्टमी सण उत्साहात साजरा



**परतूर - प्रतिनिधी**

परतुर तालुक्यातील वाटुर फाटा येथील डॉल्फिन इंग्लिश स्कूलमध्ये गोकुळ अष्टमी निमित्त दहीहंडीचे आयोजन करण्यात आले होते या प्रसंगी शाळेतील लहान लहान मुलांनी श्रीकृष्ण गोपिका यांच्या वेशभूषा धारण करून सर्व वातावरण कृष्णमय होऊन दहीहंडी व काला वाटपाचा मनमुराद आनंद लुटला. बालकांच्या हसया चेहऱ्यानि व रंगीबेरंगी कपड्यांनी शाळेचे वातावरण कृष्णमय बनले होते. पारंपरिक गाणी खेळ कृष्ण गोपिकाच्या गवळणी व गोपाळकाला याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी आपल्या संस्कृतीची जपणूक केल्याचे दिसून येत होते. विद्यार्थ्यांनी थर रचून दहीहंडी फोडली .. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षिका कुकडे विद्या. सय्यद नसरीन. काळे साधना. वैष्णवी चव्हाण. त्रिवेणी सनईकर. सानू जाधव. शेळके गजानन यांनी परिश्रम घेतले.

# टक्का दिला तरच व्यवहार पक्का

काही दिल्या शिवाय काही मिळत नाही. स्थानीक स्वराज्य संस्था असोत अथवा शासकीय - निमशासकीय कार्यालये असोत जेथे ठेकेदाराचा संबंध आला तेथे पैसा मिळणार हे गणित पक्के असते.कंत्राटदार एखादे काम मिळवण्यासाठी कामाची निविदा भरतो.त्याचवेळी कंत्राट मिळवण्यासाठी किती टक्के संबंधितांना द्यावे लागणार, साहित्याची किंमत,कामगारांची मजुरी आणि कंपनीचा नफा यांचा ताळेबंद कामाच्या कंत्राट खर्चात समाविष्ट करतो.कंत्राटदाराला कामाची कंत्राट निविदा भरण्यापासून काम पूर्ण झाल्यानंतर कामाचे पैसे मिळेपर्यंत त्या- त्या ठिकाणच्या संबंधितांचे टक्के द्यावे लागतात.साधारण रुपयातील ६० पैसे टक्क्यात जातात ४० पैशात कामाचे कंत्राट पूर्ण करावे लागते.कंत्राटदार पैसे देऊनही कोणी संबंधित आडकाठी आणत असेल तर मात्र अनेक प्रश्न निर्माण होतात.नुकताच बदलापूर नगरपरिषदेत असाच काहीसा प्रकार घडला आहे.एका पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी कामाचे कंत्राट मिळवून केलेल्या कामाचे पैसे मिळावेत म्हणून गेला तेथे नियोजन समितीच्या अध्यक्षांच्या कामांच्या बिलावरून वाद झाला.पुढे प्रसंग धक्का बुक्की पर्यंत गेला.आरोप प्रत्यारोप झाले.प्रकरण प्रसार माध्यमापर्यंत गेले.पैसे घेणारा जेवढा दोषी आहे तेवढाच देणार दोषी आहे.स्वार्थासाठी नियम धाब्यावर बसवून कामे केली जातात त्यालाच भ्रष्टाचार म्हणतात.काही दिले तरच काही मिळेल हे सर्वश्रुत आहे.भ्रष्टाचार थांबवण्यासाठी आता देवालाच पृथ्वी तळावर यावे लागेल.असे सद्याचे वातावरण निर्माण झाले आहे.याचा त्रास सामान्य माणसाला होतो आहे.शासन कर्त्यांनी या बाबींचा गांभीर्याने विचार करावा.

**महादेव गोळवसकर**
**९८६९४७६२०९**
mahadeogolvaskar@gmail.com

पान १ व ४ वरुन...

### मराठा आरक्षणावर...

महत्त्वाचे मानले जात आहे. आरक्षणाच्या मुद्द्यावर केवळ आश्वासने देणे किंवा मतदारसंघातील राजकीय समीकरणांचा विचार करून भूमिका घेणे टाळून प्रत्येक राजकीय पक्षाने आपली अधिकृत आणि स्पष्ट भूमिका जाहीर करावी, अशी मागणी त्यांनी केली.
त्यामुळे आगामी काळात मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर विविध राजकीय पक्ष कोणती भूमिका जाहीर करतात आणि सरकारकडून या प्रश्नाच्या कायदेशीर व प्रशासकीय प्रक्रियेबाबत किती स्पष्टता आणली जाते, याकडे मराठा समाजासह संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

### घोषणांचे गाजर...

खर्च आणि शेतमालाला मिळत नसलेला भाव यामुळे शेतकरी संकटात असल्याचे ते म्हणाले. प्रत्येक परीक्षेचा पेपर फुटतो, भ्रष्टाचार हाच शिष्टाचार असल्याचा आरोपही त्यांनी केला. दरम्यान, जिल्ह्यात पावसाने मोठा खंड दिल्याने तत्काळ कोरडा दुष्काळ जाहीर करण्याची मागणी जिल्हाप्रमुख मनीष श्रीवास्तव यांनी केली. शिवसैनिक शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पिकांची पाहणी करून मदतीसाठी आवाज उठवतील, असे त्यांनी सांगितले. महिला जिल्हाप्रमुख रूपम घुगे यांनी लाडकी बहीण योजनेतून गरजू महिलांची नावे वगळल्याचा आरोप केला. आंदोलनानंतर दानवे यांनी पदाधिकाऱ्यांसह जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांची भेट घेऊन निवेदन दिले. त्यानंतर मनोरुग्णालय आणि ड्रायपोर्ट प्रकल्पस्थळाची पाहणी करण्यात आली.'दगडाबाई शेळके यांचे स्मारक कधी उभारणार?' मराठवाड्याची 'झाशीची राणी' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या स्वातंत्र्यसैनिक दगडाबाई शेळके यांच्या स्मारकाची घोषणा करूनही अद्याप जागा निश्चित झालेली नाही. घोषणा करून किती वर्षे झाली, आता स्मारक कधी उभारणार? असा सवाल दानवे यांनी उपस्थित केला. १७ सप्टेंबरला छत्रपती संभाजीनगरात समारोप मराठवाड्यातील प्रत्येक जिल्ह्यात 'तुम से ना हो पायेगा' आंदोलन सुरू असून, १७ सप्टेंबर रोजी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत छत्रपती संभाजीनगर येथे या जनआंदोलनाचा समारोप होणार असल्याची माहिती दानवे यांनी दिली.

### अखिल भारतीय...

काळात विविध सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य, क्रीडा व जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. पदाधिकाऱ्यांना अधिकृत ओळखपत्र मिळाल्यामुळे संघटनेच्या कार्याला नवी दिशा व अधिकृत स्वरूप प्राप्त झाले असून, आगामी काळात महासंघाच्या माध्यमातून व्यापक जनहिताचे कार्य उभे राहण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

यावेळी बशीर खान, शेख शफि क, प्रदिप दिव्यवीर, रामराव कोल्हे, मो. मारूफ खान, खाजा साद अहमद, शेख सलीम, ईम्रान खान, गणेश कातकडे यांच्यासह अनेक पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

### रोटरी मिडटाउनतर्फे...

व्यक्त करण्यात आली. आरोग्य, शिक्षण आणि सामाजिक जनजागृतीच्या माध्यमातून समाजात सकारात्मक बदल घडवून आणण्याच्या उद्देशाने रोटरी क्लब ऑफ जालना मिडटाउनचे सेवा कार्य सुरू असल्याचे अलोक नानावटी यांनी सांगितले. शिबिराच्या यशस्वीतेसाठी दीपक गेही आणि मधुसूदन राठी यांनी या उपक्रमाच्या यशस्वी विशेष परिश्रम घेतले. क्रिएट लास्टिंग इम्पॅक्ट या संकल्पनेतून राबविण्यात आलेला हा उपक्रम निरोगी आणि सशक्त समाजाच्या दिशेने एक सकारात्मक पाऊल ठरला.

### जालना ते वैष्णोदेवी...

आदी उपस्थित होते. धार्मिक श्रद्धा, सामाजिक बांधिलकी आणि युवकांच्या जिद्दीला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने जय बजरंग फाउंडेशनने या सायकल यात्रेला सहकार्य केले. चारही युवकांच्या या भक्तिमय सायकल यात्रेस उपस्थितांनी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या असून, त्यांचा प्रवास सुखरूप आणि यशस्वी होवो, अशी सदिच्छा व्यक्त करण्यात आली.

### गणेश मंडळांच्या...

नियोजन शिस्तबद्ध पद्धतीने व्हावे, यासाठी सार्वजनिक गणेश मंडळांनी वेळेत ऑनलाइन नोंदणी करून परवानगी अर्ज सादर करावेत, असे आवाहन जालना जिल्हा पोलीस दलाने केले आहे. गणेशोत्सव हा मोठ्या प्रमाणावर सार्वजनिक सहभागाचा उत्सव असल्याने मंडळांनी पोलीस विभागाच्या सूचनांचे पालन करावे आणि आवश्यक परवानग्या वेळेत प्राप्त करून घ्याव्यात, असेही पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

**ऑनलाइन नोंदणी संकेतस्थळ :**

दरम्यान, गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांनी शेवटच्या क्षणाची धावपळ टाळण्यासाठी ऑनलाइन नोंदणीची प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करावी, असे आवाहन जिल्हा विशेष शाखेचे पोलीस निरीक्षक भुंजग एन. हातमोडे यांनी केले आहे.

# अल्प पावसाने खरीप पिके संकटात; तातडीने पंचनामे करून भरपाई द्या

## परतूर-मंठ्यासह जालना जिल्ह्यातील बाधित क्षेत्राची प्रत्यक्ष पाहणी करून पंचनामे करण्याची बबनराव लोणीकरांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**परतूर - प्रतिनिधी**

परतूर-मंठा विधानसभा मतदारसंघासह संपूर्ण जालना जिल्ह्यात यंदा अत्यल्प पावसामुळे खरीप हंगाम धोक्यात आला असून, सोयाबीन, कापूस, मूग, उडीद आणि तूर या प्रमुख पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अनेक मंडळांमध्ये केवळ १३ ते २० टक्के पाऊस झाल्याने शेतांमधील पिकांची वाढ खुंटली असून सोयाबीनला फुलोरा आणि शेंगा न आल्याने उत्पादनाची शक्यता जवळपास संपुष्टात आली आहे. या पार्श्वभूमीवर तातडीने प्रत्यक्ष शेतपातळीवर पंचनामे करून बाधित शेतकऱ्यांना नुकसानभरपाई, पीक विमा आणि शासनाची मदत उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी माजी मंत्री तथा आमदार बबनराव लोणीकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. लोणीकर यांनी शनिवार, दि. ५ सप्टेंबर रोजी मुख्यमंत्री फडणवीस यांना पत्र पाठवून परतूर-मंठ्यासह जालना जिल्ह्यातील अत्यल्प पावसामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीकडे शासनाचे लक्ष वेधले आहे.

यंदाच्या खरीप हंगामात सुरुवातीपासूनच पावसाची स्थिती अत्यंत प्रतिकूल राहिली आहे. अनेक मंडळांमध्ये अपेक्षित पावसाच्या तुलनेत केवळ १३ ते २० टक्के पाऊस झाल्याचे लोणीकर यांनी पत्रात नमूद केले आहे. पावसातील मोठ्या खंडामुळे जमिनीतील ओलावा कमी झाला असून पिकांच्या वाढीवर त्याचा गंभीर परिणाम झाला आहे. विशेषतः सोयाबीन पिकाला पुरेसा पाऊस न मिळाल्याने अनेक शेतांमध्ये अपेक्षित वाढ झालेली नाही. अनेक ठिकाणी सोयाबीनला फुलोरा व शेंगा न आल्याने उत्पादनाची शक्यता अत्यल्प राहिली आहे. कापूस, मूग, उडीद आणि तूर या पिकांनाही पावसाच्या कमतरतेचा मोठा फटका बसल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले.

बबनराव लोणीकर यांनी वाटूर, केंधळी आणि पाकणी परिसरातील शेतांची स्वतः पाहणी केल्याचे पत्रात नमूद केले आहे. या पाहणीदरम्यान शेतकऱ्यांशी संवाद साधून पिकांची सद्यस्थिती आणि त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. शेतकऱ्यांनी खरीप पिकांसाठी बियाणे, खते, कीटकनाशके, औषधे तसेच मशागतीसाठी मोठ्या प्रमाणावर खर्च केला आहे. अनेक शेतकऱ्यांनी कर्ज काढून हंगामाची तयारी केली. मात्र, पावसाने साथ न दिल्याने संपूर्ण हंगाम हातातून जाण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे हा प्रश्न केवळ पीक नुकसानीपुरता मर्यादित नसून हजारो शेतकरी कुटुंबांच्या उदरनिर्वाहाचा आणि जगण्याचा प्रश्न बनला असल्याचे लोणीकर यांनी स्पष्ट केले. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळण्यासाठी प्रशासनाने विलंब न करता प्रत्यक्ष शेतपातळीवर पंचनामे सुरू करावेत, अशी आग्रही मागणी लोणीकर यांनी केली आहे.



जिल्हाधिकारी यांनी शासनाच्या स्वतंत्र आदेशाची वाट न पाहता परिस्थितीचा प्राथमिक अहवाल शासनाकडे सादर करावा आणि त्यानंतर बाधित क्षेत्रातील पिकांचे प्रत्यक्ष पंचनामे तातडीने सुरू करावेत, असे त्यांनी मुख्यमंत्र्यांना पाठविलेल्या पत्रात म्हटले आहे.

ज्या क्षेत्रात ३३ टक्क्यांपेक्षा अधिक पीक नुकसान झाले आहे, त्या क्षेत्रातील पात्र शेतकऱ्यांना नियमानुसार पीक विमा, नुकसानभरपाई आणि शासकीय मदत तातडीने उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे.

पीक विमा भरलेल्या पात्र शेतकऱ्यांना विम्याचा लाभ मिळावा, तसेच शासनाच्या निकषांनुसार विमा न भरलेल्या परंतु बाधित व पात्र शेतकऱ्यांनाही उपलब्ध असलेल्या शासकीय मदतीपासून वंचित ठेवू नये, अशी भूमिका लोणीकर यांनी मांडली आहे. शेतकऱ्यांचे नुकसान शासनाच्या निदर्शनास आणून दिल्यानंतरही मदत मिळण्यास विलंब झाला, तर हा प्रश्न विधानसभेत अत्यंत ठामपणे उपस्थित करणार असल्याचा इशारा बबनराव लोणीकर यांनी दिला आहे. शेतकऱ्यांना प्रत्यक्ष मदत मिळेपर्यंत पाठपुरावा थांबवणार नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. त्यामुळे आता प्रशासनाने तातडीने नुकसानग्रस्त भागाचा आढावा घेऊन पंचनाम्याची कार्यवाही सुरू करण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

मुख्यमंत्र्यांना पाठविलेल्या पत्रात लोणीकर यांनी म्हटले आहे की, शेतकऱ्यांनी पीक वाचविण्यासाठी आपले सर्वस्व पणाला लावले आहे. मात्र, पावसाने दगा दिल्यामुळे त्यांच्यासमोर गंभीर आर्थिक संकट निर्माण झाले आहे. अशा परिस्थितीत शासनाने शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याची गरज आहे.

''पंचनामे तातडीने करा, नुकसान निश्चित करा आणि भरपाई शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करा. संकटाच्या काळात शासन निर्णय घेण्यात विलंब करणार नाही,'' अशी अपेक्षाही लोणीकर यांनी व्यक्त केली आहे. या मागणीचे पत्र महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, कृषिमंत्री दत्तामामा भरणे, छत्रपती संभाजीनगरचे विभागीय आयुक्त, जालना जिल्हाधिकारी, निवासी उपजिल्हाधिकारी तसेच जालना, परतूर आणि अंबडचे उपविभागीय अधिकारी यांना माहितीसाठी पाठविण्यात आले आहे. त्यामुळे जालना जिल्ह्यातील अत्यल्प पावसामुळे बाधित झालेल्या खरीप पिकांचे पंचनामे, नुकसानभरपाई आणि पीक विम्याच्या मदतीबाबत आता प्रशासन कोणती भूमिका घेते, याकडे जिल्ह्यातील शेतकरी आणि कृषी क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

---

# जालना समाजकार्य महाविद्यालयात शिक्षक दिन उत्साहात साजरा




**जालना - प्रतिनिधी**

दि. ०५ सप्टेंबर २०२६ रोजी कर्मवीर प्रतिष्ठान संचलित जालना समाजकार्य महाविद्यालयात सांस्कृतिक विभागाच्या वतीने भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती शिक्षक दिन म्हणून साजरी करण्यात आली यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उप प्राचार्य डॉ.मधू खोब्रागडे हे उपस्थित होते तर प्रमुख अतिथी म्हणून कर्मवीर प्रतिष्ठान चे प्रशासकीय अधिकारी रमेश गजर हे उपस्थित होते यावेळी सर्व प्रथम कार्यक्रमात उप प्राचार्य डॉ.मधू खोब्रागडे यांच्या हस्ते डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पुष्पहार घालून पूजन करण्यात आले.व नंतर पूजा प्रधान, ईश्वर चव्हाण, योगेश खोसे, वैष्णवी जाधव यांनी आपले मनोगत व्यक्त केले या कार्यक्रमात यावेळी उप प्राचार्य डॉ.मधू खोब्रागडे,सांस्कृतिक समन्वयक प्रा.डॉ.दिपक बुक्तरे, प्रा. डॉ. नरसिंग पवार यांनी विदयार्थ्यांना मार्गदर्शन केले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन साक्षी रनशूर हिने केले तर आभार प्रदर्शन रविराज गुंजाळ यांनी केले. या कार्यक्रमास डॉ. सुधीर गायकवाड, डॉ. बालाजी मुंडे, डॉ. रेणुका बडवणे, प्रकाश दांडगे, यांच्या सह सर्व कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अभिषेक मोटारकर, मोनिका वाघमारे, अनिकेत साबळे, निवेदिता बावस्कर,अनिल राठोड, प्रदीप अचलखंब,यश टेकाळे,अशोक ठुबे आदीने प्रयत्न केले.

---

# राजमाता जिजाऊ इंग्लिश स्कूलमध्ये उत्साहात साजरा झाला शिक्षक दिन

**दत्ता देशमुख**




टेंभुर्णी राजमाता जिजाऊ इंग्लिश स्कूल, टेंभुर्णी येथे शिक्षक दिन मोठ्या उत्साहात व आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ.सर्वपल्ली राधाकृष्ण, राजमाता जिजाऊ सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून दीपप्रज्वलन करण्यात आले.

या विशेष उपक्रमात विद्यार्थ्यांनी शिक्षकांची भूमिका स्वीकारून संपूर्ण दिवस शाळेतील विविध शैक्षणिक व शिस्तीच्या जबाबदाऱ्या पार पाडल्या. विद्यार्थ्यांना शिक्षकांच्या कार्याची, जबाबदारीची आणि कर्तव्याची जाणीव व्हावी, तसेच शिक्षकांविषयी आदर व कृतज्ञता निर्माण व्हावी, या उद्देशाने ' ' हा उपक्रम राबविण्यात आला. विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या भूमिकेत वर्गात अध्यापन केले, विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले तसेच शालेय कामकाजात सक्रिय सहभाग घेतला.

या उपक्रमात लहाने सर अरमान शहा, लहाने मॅडम साधना चव्हाण, फलटणकर सर श्लोक फलटणकर, भगवत सर गौरव सपाटे, तेलंग्रे सर आरुष भिसे, उबरहांडे सर रणवीर म्हस्के, वायाळ सर विठ्ठल धारे, शिंगणे सर जनार्दन म्हस्के, स्पोर्ट्स टीचर पार्थ जाधव, सुद्रिक मॅडम अदिती राऊत, सय्यद मॅडम धर्ती रोकडे, मोरे मॅडम श्रुती चव्हाण, बकाल मॅडम रुतुजा मोरे, प्रियंका जाधव मॅडम वैष्णवी बोराडे, राधिका मॅडम सीमा म्हस्के, भालेराव मॅडम प्रगती वरगणे, प्रियदर्शनी मॅडम श्रुतिका करहाळे, शंकर सावडे सुमित पवार, शंकर जरार सय्यद, आंटी शीतल सोनसाळे यांनी शिक्षकांच्या भूमिका पार पाडल्या.

तसेच सृष्टी चेके आर्या अरख, आराध्या उबारहांडे, आरती चव्हाण, प्रगती सपाटे, मंजिरी पिंपळे, कल्याणी सुसलादे, शिवराज जगदाळे, सोहम अदबाने आणि गौरी बोऱ्हाडेड या विद्यार्थ्यांनीही म्हणून उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

विद्यार्थ्यांनी शिक्षकांची भूमिका अत्यंत आत्मविश्वासाने व जबाबदारीने पार पाडल्यामुळे शाळेतील वातावरण उत्साहपूर्ण झाले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना ''शिक्षक होणे म्हणजे केवळ शिकवणे नव्हे, तर जबाबदारी, संयम, शिस्त आणि मार्गदर्शन यांचा सुंदर संगम आहे'' याचा अनुभव मिळाला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्याध्यापक, सर्व शिक्षकवृंद व शाळेतील विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले. शिक्षक दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी शिक्षकांप्रती व्यक्त केलेल्या प्रेम, आदर आणि कृतज्ञतेमुळे हा दिवस अविस्मरणीय ठरला.

---

# सावधान!हिमालयातील विकासकामांचा अतिरेक मानवासाठी काळ बनत असून; निसर्ग कोपतो आहे व संपुर्ण जीवसृष्टी धोक्याच्या उंबरठ्यावर येऊन ठेपली आहे

दिनांक २६ ऑगस्ट २०२६ चे नेपाळमधील महातांडव नेपाळला अंधःकारात नेणारे ठरले.''ना भुतो ना भविष्यती'' अशा प्रकारचा विनाशकारी महाप्रलय जगाने पहाला.यात हजारोंच्या संख्येने जीवीत हाणी झाली असूनही ६ हजारपेक्षा जास्त नागरिक आजही बेपत्ता आहेत व लाखोंच्या संख्येने तेथील लोक बेघर झाले आहेत ही अत्यंत दुःखद आणि अंगावर शहारे येणारी घटना संपूर्ण जगाने आपल्या उघड्या डोळ्यांनी पहाली.तरीही जगातील अनेक देश विकासाच्या नावाखाली हिमालयावर किंवा निसर्गावर वेगवेगळ्या पध्दतीने घणाघाती प्रहार करीत आहेत आणि त्याचेच प्रायश्चित्त आज नेपाळ सारख्या देशाला भोगावे लागत आहेत.हिमालय परिसरातील दिवसेंदिवस महाप्रलयाची चिंता वाढत आहे कारण पाऊस,भूस्खलन, ग्लेशियर वितळणे किंवा भूकंपासारख्या घटना या क्षेत्रात अचानक विनाशकारी महापुराचा धोका वाढु शकतो. हिमालयाच्या बाबतीत विचार केला तर यांच्या लगतच्या देशांना धोका निर्माण झाला आहे व पुढे चालुन याचे रूपांतर महाविनाशकारी होऊ शकते याचे जिवंत उदाहरण नेपाळच्या रूपात जगाने पाहिले.हिमालयाच्या लगतच्या देशांमध्ये भारत, नेपाळ,चीन(तिबेट परिसर), भूतान तर पूर्णपणे हिमालयीन प्रदेश आहे,पाकिस्तान आणि काही भौगोलिक नोंदीमध्ये अफगाणिस्तान किंवा म्यानमारचा काही सिमावर्ती भाग जोडला जातो.परंतु मुख्यत्वे करून हिमालया लगतचे पाच देश मानले जातात.त्यामुळे हिमालया लगतच्या विकासकामामुळे व जलविद्युत प्रकल्पाच्या उभारणीने या पाचही देशांसाठी महाविनाशाचा आलाराम नेपाळमधून २६ ऑगस्टला झाला आहे. त्यामुळे या पाचही देशांना हिमालयालगतचे विकास कामे ताबडतोब थांबविने किंवा नियंत्रित ठेवणे गरजेचे आहे व हिमनद्यांचे संरक्षण करण्यासाठी तातडीने कठोर पावले उचलण्याची आवश्यकता आहे. मुख्यत्वेकरून चीन हिमालया लगतच्या तिबेट परिसरात एकापाठोपाठ एक नवीन-नवीन जलविद्युत प्रकल्प उभारत आहे.सोबतच रेल्वे,रस्ते वाहतूक उद्देशाने हिमालयालयामध्ये बोगदे तयार करीत असून खनण सुरू आहे.त्यामुळे आजच्या परिस्थितीत हिमालयाला सर्वात जास्त खिळखिळा करण्याचे काम चीन करीत आहे. त्यांचाच परिणाम आज वॉटर बॉम्बच्या रूपात व महाप्रलयाच्या रूपात नेपाळला भोगावा लागतो आहे.चीनने सध्याच्या परिस्थितीत आपल्या लगतच्या देशांच्या भोवताल मृत्यूची भिंत उभारल्याचे स्पष्ट दिसून येते.स्वतःचे वर्चस्व,स्वतःचा विकास व शेजारच्या राष्ट्रांवर आपली पकड रहावी या उद्देशाने चीन विनाशकारी कार्य निरंतर करीत आहे. जगात वाढती लोकसंख्या,वाढते औद्योगिकीकरण, युद्धजन्य परिस्थिती,जंगलतोड यामुळे हवामानात अवश्य बदल होत आहे आणि याचे प्रायश्चित्त संपूर्ण जग भोगत आहे यात दुमत नाही.परंतु चीन स्वतःच्या स्वार्थासाठी आपल्या शेजारच्या देशांना भयभीत करीत असून मृत्यूच्या खाईत लोटत आहे ही बाब नेपाळमधील नैसर्गिक विनाशकारी महाप्रलयावरून सिद्ध होते.आज दोन आठवडे उलटुन गेल्यानंतरही हजारो नागरिक अद्यापही बेपत्ता आहेत तरीही शोध मोहीम सुरूच आहे.अशा कठीण घडीला जगातील संपूर्ण देशांनी व संयुक्त राष्ट्रसंघटनेनी सर्वोतोपरी सरळ हातांनी मदत करण्याची गरज आहे.बदलत्या हवामानामुळे जागतिक तापमानवाढ मर्यादा ओलांडल्याने संपूर्ण जगाला याचे गंभीर परिणाम भोगावे लागणार आहेत. नेपाळची भीषण नैसर्गिक आपत्ती ही निसर्गाची फक्त एक झलक आहे.परंतु यापुढे जगात भयानक महाप्रलय, सुनामी, भुकंप,हिमकडा कोसळणे, भूस्खलन,ज्वालामुखीचा उद्रेक अशा भयावह घटना ओढावण्याची दाट शक्यता आहे.त्यामुळे चीन सारख्या देशाने निसर्गावर अतीरेक करने थांबवावे.आज नेपाळ,भारत,पाकिस्तान,चीन (तिबेट परिसर), भूतान या देशातील हिमालयातील अनेक हिमकडे धोकादायक श्रेणीमध्ये आले आहेत.यामुळेच निसर्गाचे संतुलन दीवसें-दीवस डगमगतांना दिसत आहे.मानवतेच्या अतिरेकामुळे जागतिक तापमानात वाढ झाल्याने पृथ्वीवरील होणारे गंभीर दुष्परिणाम रोखण्याची संधी मानवाने पुर्णतः गमावली आहे.त्याचेच प्रायचित्य नेपाळसह जगातील अनेक देशांना वेगवेगळ्या रूपात भोगावे लागत आहे.तरीही धोकादायक स्थितीत असलेले तापमान सुरक्षित पातळीवर कसे आणता येईल याकडे हवामान शास्त्रज्ञांचे लक्ष लागले आहे.

१९ व्या शतकाच्या मध्यातील तापमानाच्या तुलनेत १.५ अंश सेल्सिअस तापमानवाढीचे उद्दिष्ट शास्त्रज्ञांनी सर्वसाधारणपणे स्विकारले होते.परंतु आता २ अंश सेल्सिअस तापमान वाढीमुळे संपूर्ण जीवसृष्टी व पृथ्वी यांच्यावर गंभीर परिणाम होऊ शकतात असे शास्त्रज्ञांच्या माध्यमातून सांगितले जात आहे.यावरून स्पष्ट होते वाढते तापमान, दिवसेंदिवस वाढत असलेली समुद्राची पातळी व वाढत्या तापमानामुळे ग्लेशियर वितळून होणारा महाप्रलय आणि यामुळे निसर्गावर होणारे दुष्परिणाम याचे गंभीर परिणाम पृथ्वीतलावरील प्रत्येक जीवजंतूंना भोगावे लागतील.त्यामुळे जगातील देशांनी वेळ न गमावता ताबडतोब निसर्गाच्या संगोपनाच्या दृष्टीने योग्य पाऊल उचलले पाहिजे.अन्यथा संपूर्ण पृथ्वीचा विनाश अटळ आहे.भारतात हवामान बदलामुळे ( ) हिमालयातील हिमनद्या () आणि त्यांच्या वितळण्यामुळे तयार होणारी हिमनदी सरोवरे ( ) मोठ्या प्रमाणावर धोकादायक स्थितीत आली आहेत. भारताच्या राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने () राष्ट्रीय जोखीम कमी करण्याच्या कार्यक्रमांतर्गत देशातील १९५ हिमनदी सरोवरांना अतिसंवेदनशील आणि धोकादायक म्हणून चिन्हांकित केले आहे. म्हणजे भारताला हिमनद्यांचा(ग्लेशियर वितळण्याचा) धोका केव्हाही उद्भवू शकतो याला नाकारता येत नाही.

सध्याच्या परिस्थितीत भारतातील उत्तराखंड, केदारनाथ, झारखंड, ओडिशा, बिहार , उत्तरप्रदेश व इतर भागात जे पावसाचे थैमान व नद्यांच्या पुरांचे वाढते प्रमाण हा सर्वप्रकार ग्लेशियर वितळणे व निसर्गावर होत असलेला अतिरेक यामुळेच देशासह जगात धोकादायक परिस्थिती निर्माण झाली आहे.सध्याच्या परिस्थितीत संपूर्ण जग विनाशाच्या उंबरठ्यावर येऊन बसले आहे,यात जगातील युद्धजन्य परिस्थिती, जंगलतोड,वाढते शहरीकरण,औद्योगिक,हिमालय परिसरात जलविद्युत प्रकल्प उभारणी,वाढती लोकसंख्या यामुळे आकाश-पाताळ,स्थल,जल,वायू यांना मोठा धोका निर्माण झाला आहे त्याचे प्रायश्चित्त मानवजातीसह संपूर्ण सृष्टीला भोगावे लागणार आहे.

त्यामुळे नेपाळची महाविनाशकारी तांडव पहाता हिमालय लगतच्या देशांनी(चीन,भारत,नेपाळ, पाकिस्तान, भूतान) यांनी विकास कामे करतांना सावधगिरी बाळगावी.जय हिंद!

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०६७९, नागपूर.**

---

# पि.एम.श्री. जि.प. प्रशालेत दहीहंडी उत्सव उत्साहात संपन्न

## विद्यार्थिनींनी गोविंदा बनून रचले मानवी थर; दहीहंडी फोडून साजरा केला गोपाळकाला

**जाफराबाद - प्रतिनिधी**

जाफराबाद शहरातील पि.एम.श्री. जि.प. प्रशाला, जाफराबाद येथे सांस्कृतिक उत्सव संवर्धन उपक्रमांतर्गत गोपाळकाला व दहीहंडी उत्सव मोठ्या उत्साहात आणि आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला. या उत्सवामुळे संपूर्ण प्रशालेत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. प्रशालेचे मुख्याध्यापक मनोज साळवे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमात शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. यावेळी विद्यार्थिनींनी गोविंदा बनून एकत्रितपणे मानवी थर रचत दहीहंडी फोडली. दहीहंडी फोडण्याच्या क्षणी विद्यार्थ्यांनी जल्लोष करत आनंद व्यक्त केला. भारतीय संस्कृतीतील सण, उत्सव आणि परंपरांची विद्यार्थ्यांना माहिती व्हावी, तसेच त्यांच्यामध्ये एकता, बंधुभाव, सहकार्य, सद्भावना आणि सांस्कृतिक मूल्यांची जपणूक व्हावी, या उद्देशाने प्रशालेच्या वतीने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. दहीहंडी फोडण्यासाठी विद्यार्थिनींनी गोविंदा पथकाची भूमिका साकारल्याने त्यांच्या उत्साहाला उधाण आले होते. प्रत्यक्ष गोविंदा बनून मानवी थर रचण्याचा अनुभव विद्यार्थ्यांसाठी विशेष आकर्षण ठरला.



एकमेकांना सहकार्य करत थर रचताना विद्यार्थ्यांमध्ये संघभावना आणि परस्पर सहकार्याची भावना अधिक दृढ झाल्याचे दिसून आले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना केवळ मनोरंजनाचा आनंद मिळाला नाही, तर भारतीय सण-परंपरांमागील सामाजिक आणि सांस्कृतिक मूल्यांची जाणीवही करून देण्यात आली.







जालना - श्री कृष्ण जन्माष्टमी निमित्त अहिर नवयुवक संघ तर्फे भव्य शोभायात्रा काढण्यात आली त्यावेळी ठीक ठिकाणी दही हंडी फोडण्यात आली व गुलाल आणि पुष्पवृष्टी ही करण्यात आली (छाया/जावेद तंबोली)

# अखिल भारतीय लोकहित महासंघाच्या पदाधिकाऱ्यांना ओळखपत्रांचे वाटप

**जालना - प्रतिनिधी**

समाजहित, जनजागृती आणि लोककल्याणाच्या विविध उपक्रमांसाठी कार्यरत असलेल्या अखिल भारतीय लोकहित महासंघाच्या पदाधिकाऱ्यांना आज अधिकृत ओळखपत्रांचे वाटप करण्यात आले. संघटनेच्या कार्याला अधिक शिस्तबद्ध, पारदर्शक आणि प्रभावी स्वरूप देण्याच्या उद्देशाने हे ओळखपत्र देण्यात आले.



यावेळी महासंघाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. पदाधिकाऱ्यांना ओळखपत्र प्रदान करताना संघटनेच्या माध्यमातून समाजातील विविध घटकांच्या समस्या जाणून घेऊन त्या सोडविण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन करण्यात आले. यावेळी मार्गदर्शन करतांना महासंघाचे अध्यक्ष शेख चाँद पी.जे. यांनी सांगीतले की, ओळखपत्र हे केवळ पदाची ओळख नसून समाजाप्रती असलेल्या जबाबदारीचे प्रतीक आहे, असे यावेळी सांगण्यात आले. प्रत्येक पदाधिकाऱ्याने महासंघाची ध्येयधोरणे आणि सामाजिक बांधिलकी जपत प्रामाणिकपणे कार्य करावे, तसेच गरजू नागरिकांना योग्य मार्गदर्शन व सहकार्य करावे, असे आवाहन ही शेख चाँद पी.जे. यांच्या वतीने करण्यात आले. महासंघाच्या संघटनात्मक विस्तारासाठी आगामी *(पान २ वर)*

# रोटरी मिडटाउनतर्फे आयोजित शिबिरात दोनशे शालेय विद्यार्थ्यांची दंत तपासणी

## मानेगाव जिल्हा परिषद शाळेत शिक्षकदिनी शिक्षकांचा गौरव

**जालना - प्रतिनिधी**

सामाजिक व शैक्षणिक उपक्रम राबविण्यात सदैव अग्रेसर असलेल्या रोटरी क्लब ऑफ जालना मिडटाउनतर्फे मानेगाव (खा.) येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत शिक्षक दिन साजरा करण्यात येऊन शिक्षकांचा गौरव करण्यात आला. यावेळी आयोजित शिबिरात २०० विद्यार्थी आणि नागरिकांची दंत तपासणी करण्यात आली.



शिबिराचे उद्घाटन सरपंच ज्ञानेश्वर राठोड व शालेय समितीचे अध्यक्ष नारायण जाधव, क्लबचे अध्यक्ष अलोक नानावटी, सचिव मनमोहन भक्कड यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. रोटेरियन डॉ. प्रतीक लाहोटी व डॉ. सुमित राठी यांनी या शिबिरात विद्यार्थ्यांची दंत तपासणी करून तोंडाच्या स्वच्छतेबाबत मार्गदर्शन केले. निरोगी दातांच्या सवयी आणि प्रतिबंधात्मक काळजी याबाबत यावेळी जनजागृती करण्यात येऊन प्रत्येक विद्यार्थ्याला टूथब्रश आणि टूथपेस्टचे वाटप करून नियमित दातांची स्वच्छता राखण्याचा संदेश देण्यात आला.

शिक्षक दिनानिमित्त भारताचे माजी राष्ट्रपती व महान शिक्षणतज्ज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. शिक्षक दिनाचे औचित्य साधून शाळेचे शिक्षक संतोष नागवडे, विठ्ठल पडूळे, प्रदीप मेहत्रे, शिक्षिका पोर्णिमा मस्के, करुणा सोनवणे यांचा विशेष सन्मान करण्यात आला. शिक्षकांच्या समाज घडविण्यातील अमूल्य योगदानाबद्दल रोटरी क्लबतर्फे कृतज्ञता *(पान २ वर)*

# परतूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध दारू विक्रीवर छापे; एकूण ७८,३५० रुपयांचा मुद्देमाल जप्त

**परतूर - प्रतिनिधी.**

परतूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत गुप्त बातमीदाराच्या माहितीवरून पोलिसांनी दोन वेगवेगळ्या ठिकाणी छापा मारून अवैध दारूची चोरटी विक्री करणाऱ्यांविरुद्ध धडक कारवाई केली आहे. या दोन्ही कारवायांमध्ये एकूण ७६,३५० रुपये किमतीची देशी व विदेशी दारू जप्त करण्यात आली असून दोन आरोपींवर महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. कारवाईचा सविस्तर तपशील खालीलप्रमाणे आहे: पहिली कारवाई (आंबा येथे): दिनांक ०५/०९/२०२६ रोजी सकाळी ११:५० वाजता पोलीस पथकाने आंबा (ता. परतूर) येथील एका पत्र्याच्या शेडवर छापा मारला. या कारवाईत आरोपी बालासाहेब लिबाजी गायकवाड (वय ३५ वर्षे, रा. आंबा) हा विनापरवाना दारू विक्री करताना



मिळून आला. त्याच्या ताब्यातून ऑफिसर चॉईस, मॅकडॉल नंबर १, रॉयल स्टॅग आणि भिंगरी संत्रा/बडीशेप या देशी-विदेशी दारूच्या एकूण ७३,८५० रुपये किमतीच्या बाटल्या जप्त करण्यात आल्या. दुसरी कारवाई (मसला फाटा येथे):
त्याच दिवशी (०५/०९/२०२६) सकाळी ११:३० वाजेच्या सुमारास रांजणी-परतूर रोडवरील मसला फाटा येथे असलेल्या एका शेडवर पोलिसांनी दुसरी कारवाई केली. या ठिकाणी आरोपी दिपक दादाराव शेजुळ (वय ३४ वर्षे, रा. मसला) याच्याकडून २,५०० रुपये किमतीच्या २५ देशी दारूच्या बाटल्या (भिंगरी संत्रा) जप्त करण्यात आल्या.

**पोलीस कारवाई व कायदेशीर पावले:**

ही कारवाई ही मा. पोलीस अधीक्षक श्री. तेघबीर सिंग संधू, मा. अपर पोलीस अधीक्षक, विक्रम साळी, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी,आर. टी. रेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सुदाम भागवत,पोलीस उपनिरीक्षक अमोल रावते,मपोकॉ/१५०० सपना देविदास वाघ, पोकॉ/१४१९ जाधव, पोकॉ, गोविंद पवार, ज्ञानेश्वर वाघ, परमेश्वर माने, नितीन बोन्डारे या पोलीस कर्मचाऱ्यांच्या पथकाने पंचांसमक्ष पार पाडली. दोन्ही कारवाया मिळून एकूण ७६,३५० रुपयांचा मुद्देमाल सील करून पोलीस ठाण्यात जमा करण्यात आला आहे..दोन्ही आरोपींविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५(अ)(ई) अन्वये कायदेशीर गुन्हे नोंदवण्यात आले असून पुढील तपास पोहेकॉ/१४१९ देविदास जाधव हे करत आहेत.

# जालना ते वैष्णोदेवी सायकल यात्रेला जय बजरंग फाउंडेशनकडून शुभेच्छांसह रवाना

**जालना - प्रतिनिधी**

जय बजरंग फाउंडेशनच्या वतीने चार युवकांना सायकलींचे वाटप करून जालना ते वैष्णोदेवी सायकल यात्रेसाठी रवाना करण्यात आले. विठ्ठल राजू जुंदारे, रामेश्वर प्रल्हादराव तपसे, राहुल तुकाराम गुंजाळ आणि करण अशोकआप्पा काटकर हे चार युवक वैष्णोदेवीच्या



दर्शनासाठी जालन्यातून सायकलने प्रवासाला निघाले आहेत. जालना येथील श्री गडबडेश्वर महादेव भजन मंडळी, बाबाजी खुंटी, कन्हैयानगर येथे सर्वप्रथम महादेव मंदिरात महाआरती करण्यात आली. त्यानंतर जय बजरंग फाउंडेशनच्या वतीने चारही सायकल यात्रेकरूंना शुभेच्छा देत यात्रेला सुरुवात करण्यात आली. यावेळी जय बजरंग फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष विपुल भैय्या राय, संस्थापक उपाध्यक्ष विनोद भैय्या राऊत, प्रांजल विपुल राय, जालना जिल्हाध्यक्ष उमेश कुटे, तसेच तोशु सिंग, गणेश पवार, संतोष सिंग, मनीष चंदनकर, सिद्धांत मोर, बबन दाभाडे, नगरसेवक योगेश भगत, नगरसेवक दीपक राठोड, भगु भगत, अक्षय पहाडिये, संतोष भोसले, गोविंद भगत, विनोद भगत, सौरभ भगत, शुभम भगत, पवन बटावाले, बिशन भगत, संकेत कटकडे, गणेश घोडके, यश घोडके, धनराज भगत, बाबा जांगडे, रामेश्वर शिंदे *(पान २ वर)*

# डॉल्फिन इंग्लिश स्कूल वाटुर फाटा येथे शिक्षक दिन उत्साह साजरा

**परतूर - प्रतिनिधी**

परतुर तालुक्यातील वाटुर फाटा येथील डॉल्फिन इंग्लिश स्कूल मध्ये ज्ञान संस्कार आणि राष्ट्र निर्मितीचे दीपस्तंभ दिवंगत राष्ट्रपती,प्रख्यात शिक्षणतज्ज्ञ आणि भारतरत्न भारताचे द्वितीय राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन, शिक्षणाच्या माध्यमातून राष्ट्रनिर्मितीचा आदर्श त्यांनी आपल्या कार्यातून देशासमोर ठेवला.



त्यांच्या जन्मदिनी साजरा होणारा राष्ट्रीय शिक्षक दिन म्हणजे ज्ञान, संस्कार,मूल्ये आणि आत्मविश्वासाची शिदोरी देणाऱ्या गुरुजनांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस, शिक्षक दिवस उत्साहात साजरी करण्यात आला.

यावेळी शाळेचे मुख्याध्यापिका, श्रीमती कुकडे विद्या यांनी डॉक्टर सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून पूजन करण्यात आले. यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी शाळेच्या सर्व कारभार आज स्वतः चालवला. वरच्या वर्गातील विद्यार्थ्यांनी स्वतः शिक्षक बनून लहान वर्गावर जाऊन विद्यार्थ्यांना शिकवण्याचा अनुभव घेतला. हा कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता शाळेतील शिक्षिका सय्यद नसरीन. साधना काळे . वैष्णवी चव्हाण . त्रिवेणी सनईकर. सानू जाधव . शेळके गजानन इत्यादींनी मेहनत घेतली.

## गणेश मंडळांच्या ऑनलाइन नोंदणीसाठी जालना पोलिसांची सुविधा

# गणेशोत्सव २०२६ साठी 'सिटीझन पोर्टल'वरून परवानगी अर्ज करता येणार; स्पर्धांमध्ये सहभागी होण्यासाठी नोंदणी आवश्यक

**जालना | प्रतिनिधी**

आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर जालना जिल्हा पोलीस दलाने सार्वजनिक श्रीगणेश मंडळांसाठी ऑनलाइन नोंदणी व परवानगी अर्जाची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. जिल्ह्यातील सार्वजनिक गणेश मंडळांना पोलीस विभागाकडे नोंदणी करण्यासाठी आता पोलीस कार्यालयात प्रत्यक्ष येण्याची आवश्यकता नसून, 'आपले सरकार' अंतर्गत उपलब्ध असलेल्या महाराष्ट्र पोलिसांच्या सिटीझन पोर्टलच्या माध्यमातून ऑनलाइन अर्ज करता येणार आहे. त्यामुळे गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांना नोंदणी प्रक्रिया अधिक सुलभ व वेळेची बचत करणारी ठरणार आहे. यंदा १४ सप्टेंबर ते २५ सप्टेंबर २०२६ या कालावधीत गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे. राज्य शासनाने गणेशोत्सवाला 'राज्य महोत्सव' म्हणून घोषित केले असून, या पार्श्वभूमीवर विविध उपक्रम व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धांमध्ये सहभागी होणाऱ्या गणेश मंडळांसाठी पोलीस विभागाकडे सार्वजनिक गणेश मंडळाची नोंदणी करणे आवश्यक असल्याचे जालना जिल्हा पोलीस दलाने स्पष्ट केले आहे. पोलीस अधीक्षक तेघवीर सिंह संधू यांच्या संकल्पनेतून जिल्ह्यातील सर्व सार्वजनिक गणेश मंडळांसाठी ऑनलाइन नोंदणीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. गणेश मंडळाच्या अध्यक्ष अथवा अधिकृत अर्जदाराने महाराष्ट्र पोलिसांच्या सिटीझन पोर्टलवर जाऊन सर्वप्रथम स्वतःची वैयक्तिक माहिती भरून यूजर आयडी तयार करणे आवश्यक आहे. त्यानंतर तयार करण्यात आलेल्या यूजर आयडीचा वापर करून सार्वजनिक गणेश मंडळाच्या वतीने गणेशोत्सव साजरा करण्याबाबतचा ऑनलाइन अर्ज पूर्णपणे भरून सादर करता येणार आहे. अर्जामध्ये आवश्यक माहिती अचूक व पूर्णपणे भरावी, असे आवाहन पोलीस विभागाकडून करण्यात आले आहे. गणेश मंडळाने ऑनलाइन अर्ज यशस्वीरीत्या सादर केल्यानंतर अर्ज स्वीकारला गेल्याबाबतची माहिती संबंधित अर्जदाराला एसएमएस अथवा ई-मेलद्वारे कळविण्यात येणार आहे. त्यामुळे अर्ज भरताना अर्जदाराने स्वतः चा मोबाईल क्रमांक व ई-मेलची माहिती अचूक नमूद करणे महत्त्वाचे ठरणार आहे. ऑनलाइन प्रक्रियेमुळे गणेश मंडळांना परवानगीसाठी होणारी धावपळ कमी होण्यास मदत होणार असून, मंडळांच्या नोंदणी प्रक्रियेत अधिक पारदर्शकता व सुलभता येण्याची अपेक्षा आहे. ऑनलाइन अर्ज भरताना अर्जदारांना कोणत्याही प्रकारची तांत्रिक अडचण निर्माण झाल्यास मार्गदर्शनासाठी पोलीस विभागाने संपर्क क्रमांक उपलब्ध करून दिला आहे. अर्जदारांनी मपोहेकॉ-१५४६ रुपाली राखे यांच्याशी मोबाईल क्रमांक ९८२३६२१५९० वर संपर्क साधून आवश्यक मार्गदर्शन घ्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.
गणेशोत्सव काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याबरोबरच उत्सवाचे *(पान २ वर)*

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.